# संगीत कानसेन

## भारतीय शास्त्रीय संगीताची लय ताल आणि ठेका

भाग - ४

ई साहित्य प्रतिष्ठान

# संगीत कानसेन भाग ४

## ताल, ठेका आणि लय

संकल्पना व लेखन :

सुनिल सामंत

मांडणी व सजावट :

अमृता ढगे

तांत्रिक सहाय्य

आनंद माने

प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान

जी ११०२, इटर्निटी

ठाणे, 400604

www.esahity.com

©2011 : ई साहित्य प्रतिष्ठान

संपर्क :

esahity@gmail.com

sangeet.kansen@gmail.com

9869674820

अनुक्रमणिका


४ लय आणि ताल

८ तालवाद्यं

९ तबला

१५ तालांचे व्याकरण

२० आड, कुआड, सवारी

२२ तबल्याचे काही ताल

२६ पखावज आणि मृदंग

२७ पखावजचे ताल

३० परिशिष्ट

३८ गृहपाठ

# लय आणि ताल

“शास्त्रीय संगीताबद्दल जर कोणती गोष्ट बोअर करत असेल तर ते नुसतं जे आ लावून बसतात ते. जो राग सिनेमाच्या गाण्यात इतका मस्त वाटतो तोच जेव्हा हे शास्त्रीय गायक गायला बसतात तेव्हा कंटाळवाणा का वाटतो?” – शास्त्रीय संगीत आपल्याला आवडत नाही हे अत्यंत प्रामाणिकपणे सांगणाऱ्या एका मुलीचे हे उद्‌गार. या मुलीला संगीत आवडतं. पण शास्त्रीय संगीत सहनही होत नाही. पहिल्या पाच मिनिटांतच पेशन्स संपून जातो. हे असं कशामुळे होतं ?

ख्याल म्हणा, गत म्हणा वा ध्रुपद, सुरुवातीची काही वेळ मुक्त आलापांत रागाचं स्वरूप दाखवलं जातं. या वेळात तबल्याची साथ नसते. आताचं जेव्हढं म्हणून  पॉप्युलर संगीत आहे त्यातून ताल काढा , ऱ्हिदम बाजूला काढा. आणि बघा संगीत कसं अळणी होऊन जातं. मग तो मायकल जॅकसन असो वा लता मंगेशकर. हा ऱ्हिदम, ही लय , हा ताल हा सगळया संगीताचा जणू प्राणच आहे. सूर हा जर पिता तर ताल ही माता.  तालाचं दिग्दर्शन नसेल तर सूर कसे आणि कुठे भरकटतील याचा काहीच भरंवसा नाही. ताल म्हणजे सोबतीचं तालवाद्य, तबला किंवा ड्रमर नव्हे. विना साथीने अगदी नुसता गायक लयीत गाणं म्हणत असला तरी ऐकणारा आपोआप टाळ्या वाजवतो, किंवा चिटक्या वाजवतो किंवा मांडीवर बोटांनी ताल धरतो. मात्र गायकाने गाणं लयीच्या तालाच्या कक्षेत बांधलेलं असायला हवं.

हा ताल म्हणजे आहे तरी काय ? आणि शास्त्रीय संगीतात हा ताल कमी का असतो ? एकदम ढिनच्याक का नाही वाजत हे शास्त्रीय संगीत? (*खरं तर शास्त्रीय संगीतात ताल दुय्यम असतो हा एक गैरसमज आहे. शास्त्रीय संगीतात ताल अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. आणि अनेक सुंदर सुंदर तालांचं अतिशय कॉप्लेक्स सादरीकरण शास्त्रीय संगीतात असतं.*)

ताल म्हणजे सोप्प्या भाषेत सांगायचं तर टाळी. दोन हातांचे तल (तळहात) एकावर एक आपटले तर जो ध्वनी होतो तो म्हणजे ताल , म्हणजे टाळी. सुखकर्ता दुखहर्ता म्हणायला सुरूवात करा. टाळी आपोआप वाजायला लागते. कोणी शिकवतं? छे! ही टाळी, हा ऱ्हिदम आपल्या आत असतोच. अख्खं आयुष्य एका लयीत चालू असतं. आपला श्वास, आपली नाडी, आपलं हृदय, आपली चाल, आपली भूक प्यास, आपली झोप, आपलं दैनंदिन आयुष्य, दिवस, महिने, वर्षं, आयुष्य, सगळं काही एका लयीत चालू असतं. लहानपणी आपल्याला झोपवताना थोपटलं, पाळण्यात घालून लयीत जोजवलं की कसे मस्त झोपतो!

आपले सर्व नैसर्गिक व्यवहार लयीत चालत असतात. काही गोष्टी द्रुत लयीत होतात, तर काही संथ म्हणजे विलंबित. नाडी दर सेकंदाला चालते. श्वास दर दहा सेकंदांनी होत असतो. भूक दर चार तासांनी लागते. कोठा दररोज साफ़ करावा लागतो. प्रत्येक गोष्टीची एक लय असते. सगळं काही लयीत चाललं की कसं बरं वाटतं! आपण चालताना एका लयीत चालतो. दोन पावलं भरभर, मग अचानक हळू हळू ...असं चालत नाही. चालताना जरासं लंगडलं, किंवा काही बिघडलं की लय बिघडते. मग समोरच्याच्या लक्षात येतं.

प्रत्येक व्यक्तीची जशी स्वतःची एक लय असते, तशीच प्रत्येक गाण्याची एक स्वतःची लय असते. काही गाण्यांची विलंबित म्हणजे संथ असते.

काही गाण्यांची अति विलंबित असते. काही गाण्यांची द्रुत असते. काही गाण्यांची अतिद्रुत असते. काही वेळा तर अणुद्रुत लय असते.
आता "सुखकर्ता दुखहर्ता" ची लय वेगळी, "आरती ज्ञानराजा" ची लय वेगळी आणि "घालिन लोटांगण"ची लय वेगळी. आरती ज्ञानराजा म्हणताना कसं मस्त तरंगल्यासारखं वाटतं नाही? आणि घालिन लोटांगण सुरू झालं की एकदम नाचावंसं वाटतं. उत्साह संचारतो. सगळयाच संगीताला एकच लय वापरून कसं चालेल?
भारतीय शास्त्रीय संगीतात तालाचा जेवढा कॉप्लेक्स अभ्यास केला आहे तेवढा कुठेच नाही. पण पाच हजार वर्षांपुर्वी घड्याळबिड्याळ नसताना हा अभ्यास केला तरी कसा? ताल येतो कुठून? त्यासाठी काल, ताल, मात्रा, लय, हे समजून घेतलं पाहिजे.
जसं तासामध्ये ६० मिनिटं असतात आणि मिनिटामध्ये ६० सेकंद असतात, तसे प्रत्येक तालामध्ये एक आवर्तन असतं. आणि प्रत्येक आवर्तनात काही विशिष्ट मात्रा असतात. आणि प्रत्येक मात्रेमध्ये काही विशिष्ट बोल. एक मात्रा म्हणजे साधारण एक सेकंद. पण पुर्वी तर सेकंद नव्हताच. मग मात्रा म्हणजे नाडीचा एक ठोका. किंवा एक पलक ( पळभर म्हणतात ना!), निमिष, किंवा पापणी उघडझाप करायला लागेल इतका काळ. तबला किंवा मृदंग किंवा ड्रम वाजवणाऱ्याला घड्याळात बघून वाजवायचं नसतं. किंवा सुखकर्ता दुखहर्ता म्हणताना आपण जो ताल धरतो तोही आपल्या नकळत आपण हृदयाच्या ठोक्यानुसारच धरतो. दहाजण आरती म्हणत असतील तर एक कोणी म्होरक्या लय ठरवतो आणि बाकीचे आपोआप तो ठेका धरतात. (माहिती म्हणून सांगतो, सुखकर्ता दुखहर्ता हा सहा मात्रांचा दादरा ताल आहे आणि आरती ज्ञानराजा हा चार मात्रांचा केरवा) इथे म्हणणाऱ्याला, टाळी धरणाऱ्याला

किंवा ऐकणाऱ्याला तालाचं नांव माहिती नसतं. पण तो आपोआप तालात, ठेक्यात आणि लयीत येतोच.

लय म्हणजे काय ?

लय म्हणजे वेग. "आरती ज्ञानराजा" आणि "घालिन लोटांगण" यांचा ताल एकच आहे. कहरवा. पण लय ज्ञानराजाची संथ किंवा मध्यम असते आणि घालिन लोटांगणची द्रुत किंवा जलद असते. शास्त्रीय संगीतात अशा पाच लयी आहेत. अर्थात लयी अनंत आहेत. पण त्यांना या पाच लयींत धरलं जातं. अतिविलंबित (ठाय), विलंबित, मध्यम, द्रुत आणि अतिद्रुत. अतिद्रुताहूनही जलद अशी अणुद्रुत लयही असते. म्हणजे पापणीच्या चारपट वेगाने वाजणारी मात्रा. ख्याल नेहमी विलंबित किंवा अतिविलंबित लयीत सुरू होतो. आणि हळू हळू आस घेत लय वाढत जाते. विलंब म्हणजे उशीर. विलंबित म्हणजे धीमी.

ख्यालात दुसरा भाग येतो मध्य लयीचा (किंवा अनेक गायक विलंबितानंतर डायरेक्ट द्रुतातही जातात). हे म्हणजे सिनेमाच्या क्लायमॅक्स सारखं असतं. सिनेमा सुरू होताना अगदी संथ गतीने कथा सांगितली जाते. पण शेवटाला पोहोचते तेव्हा कथा भराभर धावते. लोकगीत किंवा पाश्चात्य पॉप संगीत एकाच लयीत सुरू होतं आणि त्यातच संपतं. मात्र ख्याल अतिविलंबित आलापी घेऊन सुरू होतो आणि अति द्रुतात शेवटची एक दोन मिनिटं चालून संपतो.

# तालवाद्यं

तालाची माहिती समजण्याआधी तालवाद्यांवर एक नजर टाकूया. पखावज, मृदंग ही प्राचीन काळापासून चालत आलेली तालवाद्यं, तर तबला हे अलिकडच्या म्हणजे गेल्या चारपाचशे वर्षांतलं तालवाद्य. या सर्वच वाद्यांचं मूळ प्रिंसिपल सारखंच आहे. उजव्या बाजुच्या तबल्यातून वरच्या स्वरातले ध्वनी येतात तर डाव्या बाजुच्या डग्ग्यातून घुत्कार, घुमणारे ध्वनी येतात. पखावज मध्ये तबला आणि डग्गा यांच्या ऐवजी शाईची बाजू आणि आट्याची (पिठाची) बाजू असते. सध्यातरी आपण फ़क्त तबल्याची जुजबी माहिती घेऊ. पखावज किंवा मृदंगाची माहिती मिळवणं हे काम मी वाचकांवर सोपवतो.


# तबला



साधारण तबला हा असा दिसतो. सर्वसाधारण तबलावादक डावीकडे डग्गा (याला बायां सुद्धा म्हणतात) आणि उजवीकडे तबला (याला दायाही म्हणतात) ठेवतात. काही जण हे सोयीनुसार उलटही ठेवतात.

दायां (तबला) :

खोल : तबल्याचं जे लाकडी भांडं असतं त्याला खोल म्हणतात.
पुडी किंवा पल्ली : तबल्यावरचं जे चामड्याचं अंग असतं त्याला पुडी किंवा पल्ली म्हणतात. ही तीन चामड्यांची असते.




गजरा : चामड्याच्या भोवताली जी कातडी वीण असते तिला गजरा म्हणतात. त्याच्या भोवतालच्या छिद्रांना आंख म्हणतात.

चांटी किंवा किनारी : सर्वात बाहेरचं चामडं. गजऱ्याला लागून असणारं. गालावर चांटा मारतात ना ? तसं या चांटीवर संपुर्ण बोटांनी ध्वनी काढला जातो.

शाई : तबल्याच्या मध्यभागी जो काळा उंचवटा दिसतो त्याला शाई म्हणतात. ही शाई विशिष्ट पावडरपासून बनवलेली असते. हिचे थर चढवणं ही एक कला आहे. शाईचा थर जितका चांगला तितका तबला

सुरात गातो. ही शाई म्हणजे नुसता रंग नसतो. त्यात लोखंडी कीस आणि सरस याबरोबरच अनेक प्राणीज व वनस्पतीज पदार्थ असतात ज्यांच्या मिश्रणाचा एक फ़ॉर्म्युला असतो. या शाईच्या परफ़ेक्शनवरच तबल्याचा सूर अवलंबून असतो.

मैदान किंवा लब : चाटी आणि शाई यांच्या मधल्या तिसऱ्या चामड्याला मैदान असं म्हणतात.

बद्धी किंवा वादी : तबल्याच्या बाजूला बाजूला गजऱ्यापासून निघालेल्या कातडी धाग्यांना वादी किंवा बद्धी म्हणतात. ही बद्धी सुद्धा चामड्याची असते. हा एक अखंड कातडी दोर असतो आणि याची लांबी ३० ते ४० फ़ूट इतकी असते. ही बद्धी जितकी मजबूत तितका तिच्यावर ताण देणं सोपं जातं आणि तितका तबला सुरेल वाजतो. या बद्धींचे ३२ फ़ेरे प्रत्येक तबल्याला असतात.

गट्टा : बद्धीच्या आतल्या बाजूने जे आठ गोलाकार ठोकळे असतात त्यांना गट्टे किंवा गडरी म्हणतात. हे ३ किंवा ४ इंची असतात.
बैठकीच्या वेळी छोट्या हातोडीने या गट्ट्यांवर ठोकून तबला सूरात मिळवला जातो. प्रत्येक तबला एका विशिष्ट सुराचा असतो. म्हणजे जर गायकाचा सूर “काळी एक” असेल तर तंबोरे “काळी एक” मध्ये जुळवले जातात. आणि नंतर तंबोऱ्याच्या सूराशी तबल्याचा सूर जुळवला जातो. हा सूर जुळवण्यासाठी गट्टे, बद्धी आणि हातोडी यांचा वापर होतो. कार्यक्रम संपल्यावर गट्टे वर करून तबल्याच्या बद्धीचा आणि कातड्याचा ताण कमी करून ठेवतात. पुन्हा पुढच्या कार्यक्रमात तबला जुळवावा

लागतो. तबलजीलाही सुराचे चांगले ज्ञान आणि कान असणे आवश्यक असते.

गद्दी : तबला आणि डग्गा नीट रहावा आणि त्यातून इतर आघातांचे ध्वनी निघू नयेत म्हणून खाली जी गोल उशी असते त्याला गद्दी म्हणतात.

तबलावादकांकडे अनेक स्वरांचे अनेक तबले असतात. व त्या त्या गायकाच्या सुरानुसार बैठकीला ते वेगळा तबला आणतात.

आता वर आपण तबल्याचे जे भाग पाहिले त्यातल्या चाटी, मैदान आणि शाई च्या वेगवेगळया अंगांवर हाताचे वेगवेगळे आघात केले की निरनिराळे आवाज निघतात. आडव्या बोटांचा वेगळा , बोटांच्या टिपचा वेगळा, थापेचा वेगळा, मनगटाचा वेगळा, करंगळीचा वेगळा, बोटांच्या पेराचा वेगळा असे असंख्य ध्वनी आणि प्रत्येक स्थानाचा वेगळा ध्वनी असे अक्षरशः लाखो ध्वनी तबल्यातून निघतात. याशिवाय कधी थाप तर कधी घर्षण, कधी दणक्याची थाप तर कधी लाडाची हळूवार लग्गी असं करत करत तबलावादक मैफ़लीत जान आणत असतो. या तबल्याची (किंवा पखावज, मृदंगाची) आणि काठ्यांच्या सहाय्याने बडवल्या जाणाऱ्या ड्रमची तुलनाच नाही.

आपण नेहमीच्या बोलण्यात किंवा भाषणात काही शब्दांवर विशेष जोर देतो आणि त्यामुळे त्या वाक्याचा अर्थ बदलत जातो. उदाहरणार्थ आज तू भात कर. या वाक्याचे , **आज** तू भात कर , आज **तू** भात कर, आज तू **भात** कर आणि आज तू भात **कर** असे चार वेगवेगळया अर्थाची वाक्य

होऊ शकतात. तालामध्येही काही वेळा विशिष्ट स्वर जोरात दाखवण्यासाठी तालवाद्याची साथ घेतली जाते. त्यामुळे भारतीय ताल वाद्यांत विशिष्ट अक्षरध्वनींचा समावेश आहे.

तबल्यातून ध्वनीं खालीलप्रमाणे निघतात. अर्थात वर म्हटल्याप्रमाणे या ध्वनींचे अनेक उपध्वनी असतात. त्यांना तबल्याचे “बोल” म्हणतात.

बोल

ना

धिंन

धिं

धी

धा

त्रक

तक्

नक्

ति

र

तिर्

की

ट

किट्

तू

ना

कत्

ता

कत्ता

धागे

नक

वगैरे...

हा प्रत्येक ध्वनी निघण्याची एक विशिष्ट पद्धती असते. म्हणजे कोणते बोट, कशा पद्धतीने तबल्याच्या कोणत्या जागी किती वजनाने कसे फ़िरवायचे, घासायचे वा आपटायचे यावर तो तो ध्वनी ठरतो आणि जराशी चूक वेगळाच बोल निर्माण करते. धी चा धीं व्हायला वेळ लागत नाही.

म्हणजे बघा. तबला, पखावज, मृदंग प्रत्येकाचा बोल वेगवेगळा. प्रत्येक तबल्याचा बोल वेगळा. एकाच तबल्याच्या प्रत्येक जागेचा बोल वेगळा. एकाच जागेवर प्रत्येक बोट आणि त्याची ठेवण्याची पद्धत वेगळा बोल तयार करते. अशा प्रकारे आपलं तालशास्त्र असंख्य बोलांनी श्रीमंत झालेलं आहे.

त्याच बरोबर या तालशास्त्रात असंख्य खास शब्द आहेत. त्याचा स्वतंत्र असा शब्दकोश आहे म्हणा ना. यातले काही शब्द आणि काही ताल आपण समजून घेऊ. मात्र ताल, मात्रांचा हा समुद्र एवढा मोठा आहे की त्यात आयुष्यभर पोहणारे सुद्धा कायम स्वतःला अज्ञानी समजत असतात.

# तालांचे व्याकरण

ताल आणि तालाशी संबंधित शब्द समजून घेण्यासाठी आपण “एकताल” या तालाचं उदाहरण घेऊ या.

मध्यम एकताल हा बारा मात्रांचा असतो.

मात्रा : मात्रा म्हणजे साधारण एक सेकंद, किंवा एक पलक, किंवा नाडीचा एक ठोका यांना लागणारा काळ. तबल्याचे जे बोल वाजतात त्यांनी एक मात्रा दाखवली जाते.

एक तालाचे बोल

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| धीं | धीं | धागे | त्रक | तू | ना | क | त्ता | धागे | त्रक | धी | ना |
| X | | o | | 2 | | o | | 3 | | 4 | |

वरच्या तालात त्रक ऐवजी तिरकिट सुद्धा म्हणतात आणि वाजवतात.

आवर्तन : मध्यलयीत हा ताल वाजवला तर एक सेकंदाला एक मात्रा यानुसार हा ताल वाजवायला १२ सेकंद लागतील. याला एक आवर्तन असे म्हणतात. गाणे म्हणत असताना तबल्याची तालाची अशी अनेक आवर्तने होत असतात. द्रुत लयीत हेच आवर्तन साधारण ६ सेकंदांत होतं. अति द्रुत लयीत हेच आवर्तन ३ सेकंदांत होतं आणि अणुद्रुत लयीत हेच आवर्तन, म्हणजे या बारा मात्रा, दिड सेकंदांत वाजतात.

सम : एक आवर्तन पूर्ण करून जेव्हा दुसऱ्या आवर्तनाच्या पहिल्या मात्रेवर येतो त्याला समेवर येणं असं म्हणतात आणि या मात्रेला सम म्हणतात. गाण्याची बंदिश सुद्धा समेचा विचार करून बांधलेली असते. **वाजवताना सम जोरात वजनदार वाजवून दाखवली जाते. लिहीताना समेची मात्रा फुलीने दाखवली जाते.** गायकाला त्याच्या गाण्याची अस्ताई म्हणा किंवा अंतरा म्हणा किंवा तान, आलाप यांना या समेवर आणण्याची कसरत करावी लागते. जेव्हा एखादी मोठी तान ( कधी कधी एखादी तान १०-१० आवर्तनांची असते) घेऊन गायक समेवर येतो आणि समेची जागा परफ़ेक्ट पकडतो तेव्हा श्रोते मॊठ्याने वाहवा म्हणून (किंवा टाळया वाजवून) दाद देतात.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| धीं | धीं | धागे | त्रक | तू | ना | क | त्ता | धागे | त्रक | धी | ना |
| X | | o | | 2 | | o | | 3 | | 4 | |

खंड : एका आवर्तनात मात्रांच्या संख्येचे खंड पाडले जातात. एकतालामध्ये दोन दोन मात्रांचे सहा खंड आहेत. वरच्या चित्रात उभ्या रेषांनी हे खंड दाखवले आहेत. तीनतालात चार चार मात्रांचे चार खंड असतात. रुपक तालात तीन खंड असतात. त्यातला एक खंड तीन मात्रांचा तर दोन खंड दोन दोन मात्रांचे असतात.

टाळी आणि खाली: खंडाची पहिली मात्रा टाळी किंवा खाली ने दाखवली जाते. टाळी म्हणजे जोराने वाजवण्याची मात्रा तर खाली म्हणजे हळुवार वाजवायची मात्रा. एकतालाची पहिली , पाचवी, नववी आणि अकरावी मात्रा या टाळीच्या मात्रा आहेत तर तिसरी आणि सातवी मात्रा खालीच्या

मात्रा आहेत. टाळीच्या मात्रांना क्रमांक दिला जातो तर खालीच्या मात्रांना शून्य दिले जाते. समेची मात्रा ही बहुधा टाळीची मात्रा असते.

टाळीची मात्रा टाळी वाजवून किंवा मांडीवर वाजवून दाखवतात तर खालीची मात्रा हात हवेत उलटा फ़िरवून दाखवतात. टाळी व खाली सोडून इतर मात्रा डाव्या हातावर उजव्या हाताचे एक बोट टेकवून दाखवल्या जातात. किंवा अंगठ्याने बाकिची चार बोटे स्पर्श करून दाखवतात. टाळी नंतरची पहिली मात्रा करंगळी टेकवून, दुसरी मात्रा मरंगळी टेकवून, तिसरी मात्रा मधल्या बोटाने तर चौथी मात्रा तर्जनी टेकवून दाखवतात. पाचाहून मोठा खंड नसतो.
टाळीच्या मात्रा तबल्यावर जरा जोराने वाजवल्या जातात तर खालीच्या मात्रा किंचित कमी आवाजात केल्या जातात. समेची मात्र सर्वाधिक जोरात वाजते.

पुढे जाण्यापुर्वी एकदा खालील लिंकवर जाऊन एकताल नीट समजून घ्या
tabalaa ekataal
http://www.youtube.com/watch?v=cLLhedNFZZ0

विलंबित एकताल : मध्य किंवा द्रुत एकताल १२ मात्रांचा असतो हे आपण पाहिलं. विलंबित एकताल दिसायला ४८ मात्रांचा दिसतो. त्यात १२ मात्रा असतात पण प्रत्येक मात्रा पुन्हा चार मात्रांमध्ये विभाजित केलेली असते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | धिं | S | S | त्रक |
| | X | | | |
| २ | धिं | S | S | त्रक । |
| | | | | |
| ३ | धाS | Sत | धाS | धागे |
| | O | | | |
| ४ | ति | र | कि | ट । |
| | | | | |
| ५ | तिं | S | S | त्रक |
| | 2 | | | |
| ६ | नाS | Sत | नाS | नाना । |
| | | | | |
| ७ | कत् | S | S | त्रक |
| | O | | | |
| ८ | तिं | S | S | त्रक । |
| | | | | |
| ९ | धाS | Sत | धाS | धागे |
| | 3 | | | |
| १० | ति | र | कि | ट । |

साहित्य प्रतिष्ठान

११ धिं S S त्रक
4

१२ धाS Sत धाS धागे ।।

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | धिं | S | S | त्रक |
| | X | | | |
| २ | धिं | S | S | त्रक । |
| ३ | धाS | Sत | धाS | धागे |
| | O | | | |
| ४ | ति | र | कि | ट । |
| ५ | तिं | S | S | त्रक |
| | 2 | | | |
| ६ | नाS | Sत | नाS | नाना । |
| ७ | कत् | S | S | त्रक |
| | O | | | |
| ८ | तिं | S | S | त्रक । |
| ९ | धाS | Sत | धाS | धागे |
| | 3 | | | |
| १० | ति | र | कि | ट । |
| ११ | धिं | S | S | त्रक |
| | 4 | | | |
| १२ | धाS | Sत | धाS | धागे ।। |

त्यामुळे विलंबित एकतालाचं एक आवर्तन सुमारे ४८ सेकंदांचं होतं. बहुतांश बडे ख्याल विलंबित एकतालाने सुरू होतात. मध्य लय एकतालात किंवा तीन तालात असते आणि द्रुत तीन तालामध्ये ख्यालाची समाप्ती होते. त्यामुळे बडाख्याल समजायचा तर विलंबित एकताल चांगलाच लक्षात ठेवायला हवा. कारण याची सम सुमारे मिनिटभरानेच येते. नवीन गायकाच्या दृष्टीनेही विलंबित एकताल म्हणजे कसोटीच. कारण एकदा का सम चुकली तर पुन्हा ती गाठताना त्रेधा तिरपिट उडते. विलंबित ख्याल गायन हे अत्यंत तयारीने करायचे गायन आहे.

# दुगुन, तिगुन, आड, कुआड, सवारी

पॉप संगीतात एक बरं असतं. ऱ्हिदम एकदा सुरू झाला की शेवटपर्यंत तसाच चालू रहातो. मशीनसारखा. शास्त्रीय संगीतात इतकं सोप्पं नसतं. बारा मात्रांचा एकताल सुरू झाला की मशीनसारखे आवर्तनांमागून आवर्तनं घेत रहात नाहीत. तर प्रत्येक आवर्तनात काहीतरी विशेष मज्जा करत रहातात. विशेषतः बासरी किंवा सतार, संतूर सारखं वाद्य वाजत असताना साथीला वाजणारा तबला खूप मजा मजा करत वाजवला जातो. यात पटींची मजा असते. म्हणजे १२ मात्रांच्या आवर्तनाच्या वेळात २४ मात्रा वाजवतात. याला दुगुन म्हणतात. ३६ मात्रा वाजवल्या तर तिगुन म्हणतात. दिडपट म्हणजे आड. सव्वापट म्हणजे कुआड. म्हणजे बारामात्रांच्या जागी १५ मात्रा वाजवतात. गायकाला या गणिताची व्यवस्थित जाण असावी लागते. याला “हिसाब” म्हणतात.

एका तालात दुसरा ताल वाजवणं हा याहून एक गंमतीशीर प्रकार. कधीतरी एकतालात तीन ताल वाजवला जातो. तीन तालात १६ मात्रा असतात. एकतालाच्याच लयीत हा वाजवला की तीन तालाच्या १६X३ म्हणजे ४८ मात्रा (म्हणजे तीन आवर्तनं) जेव्हा पूर्ण होतात तेव्हा गायक एकतालाच्या त्याचा बंदिशीची किंवा तानांची चार आवर्तनं घेतो (१२X४=४८) आणि मग गायक आणि तबला-नवाज दोघेही एकदम समेवर येतात. यासाठी गायक आणि तबलावादक , दोघेही तयारीचे असावे लागतात. कधी कधी जुगलबंदीत तबलावादक गायकाला मात्रांच्या जंगलात नेऊन सोडतो. जर गायकाचा आतला हिसाब पक्का नसेल तर तो गोंधळतो. अशा वेळी गायकाला स्वतःच्या आत एक तबला कायम वाजता

ठेवावा लागतो. अगदी याच्या उलट तबला वादकालाही आपल्या आत एक लेहरा वाजता ठेवावा लागतो.

लेहरा : तबला हे केवळ साथीचे वाद्य नाही. तबल्याचे अनेक सोलो कार्यक्रम होतात. तबल्याच्या सोलो सीडी वगैरे उपलब्ध आहेत. अशा वेळी तबल्याला संगत म्हणून पेटीवर एकच एक धुन वाजवली जाते. तिला लेहरा असे म्हणतात. लेहरा वाजवणं हे सोपं काम नव्हे. लेहरा वाजवणाऱ्याचा स्वतःचा आतला ताल अगदी पक्का असावा लागतो. एक एक तास तीच ती चार बटणं दाबत रहाणं म्हणजे लेहरा धरणं नव्हे. मी तर लेहरा धरणाऱ्यांना स्थितप्रज्ञ योगीच मानतो. लेहरा ऐकण्यासाठी एखादी तबल्याची सोलो बैठकच ऐकायला हवी.

# ताल

ताल : एकताल

मात्रा : १२

खंड : ६ : २,२,२,२,२,२

टाळी : १, ५, ९,११

खाली : ३,७

बोल :

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धीं | धीं | धागे | त्रक | तू | ना | क | त्ता | धागे | त्रक | धी | ना |
| X | | o | | 2 | | o | | 3 | | 4 | |

ताल : त्रिताल

मात्रा : १६

खंड : ४ : ४,४,४,४

टाळी : १, ५, १३

खाली : ९

बोल :

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | धीं | धीं | धा | धा | धीं | धीं | धा |
| X | | | | 2 | | | |

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | तीं | तीं | ता | ता | धीं | धीं | धा |
| O | | | | 3 | | | |

ताल : झपताल

मात्रा : १०

खंड : ४ : २,३,२,३

टाळी : १, ३, ८

खाली : ६

बोल :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| धी | ना | धी | धी | ना | ती | ना | धी | धी | ना |
| X | | 2 | | | o | | 3 | | |

ताल : दादरा

मात्रा : ६

खंड : २ : ३,३

टाळी : १

खाली : ४

बोल :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| धा | धी | ना | धा | ती | ना |
| X | | | o | | |

ताल : कहरवा (केरवा) मध्यलय

मात्रा : १२

खंड : ६ : २,२,२,२,२,२

टाळी : १, ५, ९,११

खाली : ३,७

बोल :

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | धी | ना | ती | ना | ना | धी | ना |
| X | | 2 | | o | | 3 | |

ताल : कहरवा, (केरवा) द्रुत

मात्रा : ४

खंड : २ : ३२,२

टाळी : १

खाली : ३

बोल :

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| धागि | नती | नक | धिन |
| X | | o | |

ताल : रूपक

मात्रा : ७

खंड : ३ : ३,२,२

टाळी : ४,६

खाली : १ (हा एकमेव असा ताल आहे ज्यात सम खाली वर येते)

बोल :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ती | ती | ना | धी | ना | धी | ना |
| X | | | 2 | | 3 | |

या शिवाय भजनी, धुमाळी, दीपचंदी असे अनेक ताल आहेत.

# पखावज आणि मृदंग

या नंतर आपण पखावजचे काही ताल बघू

पखावजच्या बोलांचे स्वरूप धुमारदार आणि कठोर असते तर तबल्याचे बोल मुलायम आणि शार्प असतात.

तबल्याच्या तबला व डग्गा या दोन्हीही अंगांना शाई असते. तर पखावजाला एका अंगाला शाई तर दुसऱ्या अंगाला आटा (खूप मळून मऊ झालेला पण कमी पाणी घातलेला मैद्याचा खास आटा) असतो.

पखावजचे बोल तबल्यापेक्षा जास्त घुमारदार आणि दमदार असतात.

धा, तिड, तिर, किड, नग, धिक्, कडान् , तिक् , धिन्न , किट् , गदि, गन , वगैरे

पखावज हे धृपद या गायनप्रकारात जास्त करून वापरले जाते. तसेच भजन किंवा किर्तनातही पखावजाचा वापर होतो.

# पखावजचे ताल :

पखावजवरचे ताल तबल्याहून वेगळे असतात.

ताल : चौताल

मात्रा : १२

खंड : ६ : २,२,२,२,२,२

टाळी : १, ५, ९,११

खाली : ३,७

( या तालाला तबल्यावरच्या एकतालाचा चुलत भाऊ म्हणता येईल. या तालाचे बोल बघून तबला आणि पखावज यांच्या ध्वनींमधला फ़रक लक्षात येईल)

बोल :

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| धा | धा | धिं | ता | किट | धा | धीं | ता | किट | तक | गदि | गन |
| X | | o | | 2 | | o | | 3 | | 4 | |

ताल : तीवरा (तेवरा)

मात्रा : ७

खंड : ३ : ३,२,२

टाळी : १,४,६

खाली : खाली नाही असा हा एकमेव असा ताल आहे . हा तबल्याच्या रूपक तालाचाच पखावजाचा प्रकार म्हणता येईल.

बोल :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| धा | धीं | ता | किट | कत | गदि | गन |
| X | | | 2 | | 3 | |

ताल : धमार

मात्रा : १४

खंड : ४ : ५,२,३,४

टाळी : १, ६, ११

खाली : ८

बोल :

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| क | ध्धी | ट | ध्धी | ट | धा | -- |
| X | | | | | 2 | |

| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
|---|---|---|---|---|---|---|
| क | त्ती | ट | ती | ट | ता | -- |
| O | | | 3 | | | |

पखावजचेही आडा चौताल, शूलताल असे अनेक प्रसिद्ध ताल आहेत.

# परिशिष्ट

ताल

उत्तर हिंदुस्तानी संगितात सुराला कालखंडाशी बांधण्याचे काम ताल करतो. उदा. त्रितालात १६ मात्रा आहेत. म्हणजे १६ समय अंश (वा तालाचे एकक (unit) ) एकत्र करून तालाची निश्चिती होते. याप्रमाणे वेगवेगळया मात्रा असलेले इतर ताल आहेत. जसे १० मात्र्यांचा झपताल किंवा ७ मात्र्यांचा रुपक. तालाने सांगितिक वेळ निश्चित केली जाते. अर्थातच प्रत्येक तालाची स्वतःची प्रकृती असते. तालाची तीच ती आवर्तने कंटाळवाणी असल्याने मूळ कालखंड कायम ठेऊन तबलजी तालाचा विस्तार करतो. यासाठी कायदे, पेशकार, चक्रधार अशी अनेक ताल-उपांगे वापरतात. यातून ठेक्याचे(rhythm) विविध आकृतीबंध (pattern) तबलजी बनवितो. आधारभूत सांगितिक कालखंड जरी तोच असला तरी तबलजीस लयीचे स्वातंत्र्य असते म्हणूनच बढत घेत तबलजी दृत लयीत जाऊ शकतो. उदा: १६ मात्र्यांच्या त्रितालामुळे जो आधारभूत सांगितिक कालखंड तयार होतो तितक्याच कालखंडात ३२ मात्र्यांचा कायदा वाजवून समेवर येता येते. संगितास ठेका देण्यासाठीही तालाचा वापर होतो.

व्याख्या

विशिष्ट कालावधीत दोन्ही हातांच्या संयोगाने वा वियोगाने काल, मार्ग, क्रिया, अंग, ग्रह, जाती, कला, लय, यती व प्रस्तार अशा दहा प्राणांनी व्याप्तमान ठेका होय.

तालाचे दशप्राण

•काल: त्रुटी, अनुद्रुत, द्रुत, लघु, गुरू, काकपद, हंसपद आणि महाहंसपद असे दहा काल आहेत. काल वेळेची मोजणी करण्यासाठी वापरतात. महाहंसपद काल त्रुटीच्या १२८ पट असतो.

•मार्ग: दक्षिण, वार्तिक, चित्र आणि ध्रुव असे चार मार्ग आहेत. मार्ग तालाची ठेवण दर्शवितो.

•क्रिया: क्रियेचे दोन प्रकार आहेत - सशब्द आणि नि:शब्द

◦सशब्द क्रियेचे प्रकार:

ध्रुव, शंपा, ताल आणि सन्निपात

•

◦ नि:शब्द क्रियेचे प्रकारः

अवाप, विक्षेप, निष्काम आणि प्रवेशक

•अंग: टाळया व काल ही तालाची अंगे आहेत. प्राचीन ग्रंथातून तालाचे स्वरूप अंगांनी दाखविले आहे. विराम,द्रुत, लघु, गुरू,प्लुत आणि काकपद ही तालाची अंगे आहेत. अंगे ही कालाच्या चौपटीत असतात. अंगे तालात किती टाळया व काल आहेत ते दर्शिवतात.

•ग्रह: कोणत्या मात्रेपासून वाजविणे सुरू केले असता गाणे तालात व्यवस्थित बसेल ही माहिती ग्रह् अंगापासून मिळते.

ग्रह चार प्रकारचे आहेत - सम, विषम, अतीत व अनागत.

•जाती:तालाच्या जाती ६ प्रकारच्या आहेत -

◦ त्र्यस्त्र (मूळ लघु अंगाच्या .||| पट असणारे ताल)

◦ चतुरस्त्र (मूळ लघु अंगाच्या १ पट असणारे ताल)

◦ खंड (मूळ लघु अंगाच्या १| पट असणारे ताल)

◦ मिश्र (मूळ लघु अंगाच्या १||| पट असणारे ताल)

◦ संकीर्ण (मूळ लघु अंगाच्या २| पट असणारे ताल)

◦ दिव्यसंकीर्ण (मूळ लघु अंगाच्या २||| पट असणारे ताल)

•कला: वाद्य वाजवताना वा ताल हाताने दर्शविताना सहा प्रकारच्या मुद्रा बनतात त्या - वक्रा,कृष्णा, सर्पिणी, पद्मिनी, अपताका, कंपना, देवसंभवा व विसर्जिनी अशा आहेत.

•लय:लय तालाचा वेग दर्शिविते. लय तीन प्रकारची असते - विलंबित, मध्ये व द्रुत

•यती:"लयः प्रवृत्तीर्नियमो अतिरित्यभिधीयते"; यती लयीची ठेवण दर्शविते. यती पाच प्रकारचे आहेत. - समा, स्त्रोतगता, गोपुच्छा मृदंगा व पिपिलिका

•प्रस्तार:(Permutations) एका लघु अंगाची विविध रूपे.

ताल सूची

पारंपारिक ग्रंथात १०८ तालांचा उल्लेख आहे. आज यातील केवळ १५ -२० ताल प्रामुख्याने वापरले जातात.

•त्रिताल

•रुपक

•केरवा

•झपताल

•चौताल

•एकताल

•भजनी

•आदीताल

•फ़रदोस्ता

•दीपचंदी

•रुपकडा

•आडाचौताल

•गणेशताल

•लक्ष्मीताल

•मत्तताल

•रुद्रताल

•शिखरताल

•ब्रह्मताल

राम राम मंडळी,


माझ्या "चला, गाणं शिकुया, समजून घेउया!" - भाग १ या लेखाला प्रतिसाद देताना पक्या यांनी ताल व लय यात फरक काय आहे? हा प्रश्न विचारला आहे. याचे ढोबळ मानाने उत्तर द्यायचे झाले तर प्रथम ताल म्हणजे काय हे ढोबळमानाने पाहावे लागेल. ताल म्हणजे लयीला बांधून ठेवणारी गोष्ट! एखाद्या गाण्याच्या चालीनुसार जी लय असते त्या लयीला अतिशय सुरेख रितीने व सुसुत्रततेने बांधून ठेवणारी गोष्ट म्हणजे ताल. मग तो कधी एकताल असेल, कधी त्रिताल असेल तर कधी केरवा असेल. हे सगळे तालाचे विविध प्रकार आहेत. तालात लयीनुसार काही खंड निश्चित केलेले असतात त्याला मात्रा म्हणतात. ७ मात्रा, ४ मात्रा, १२ मात्रा, १६ मात्रा असलेले तालाचे विविध प्रकार आहेत. धा, धीं, तीन, कत्, त्रक, गे, ना, ही तबल्यातील विविध अक्षरं आहेत, ज्याच्या साहय्याने तबलावादन आणि पर्यायाने तालवादन होते. तालाच वजन तेच राखून, मात्रांची संख्या तीच ठेवून काही वेळेला एकच ताल विविध प्रकारच्या बोलांनी, अक्षरांनी वाजवला जातो त्या ठेका असं म्हणतात. उदाहरणच द्यायचं झालं तर अशी अनेक गाणी आहेत की ज्यात केरवा हा ताल वापरला गेला आहे परंतु त्याचे ठेके मात्र वेगवेगळे आहेत! विविध ठेक्यांमुळे गाण्याच्या सौंदर्यात भर पडते.

असो, ही झाली तालासंबंधी अगदीच ढोबळ व प्रथमिक चर्चा. ताल, तबल्यातील घराणी, विविध बंदिशी, कायदे, रेले ही सर्व तालाची शास्त्रीय अंगं आहेत, त्यात आपण सध्या शिरणार नाही आहोत. तो खूपच मोठा विषय आहे व त्या बाबत सवडीने कधितरी एखादी लेखमालाच लिहायचा माझा विचार आहे. अर्थात, माझाही अजून त्यात अभ्यास सुरू आहे व तो जन्मभर सुरूच ठेवावा लागेल इतका अफाट तबला आपल्या हिंदुस्थानी अभिजात संगीतात आहे! आपलं तालशास्त्र अतिशय समृद्ध आहे!

या लेखात मी संगीतातल्या 'लय' या अत्यंत अवघड अश्या विषयावर प्राथमिक भाष्य करण्याचा प्रयत्न करणार आहे. लय ही जरी अत्यंत सूक्ष्म गोष्ट असली तरी तिचा आवाका प्रचंड आहे. लयविचार हा संबंध संगीतालाच व्यापून टाकणारा प्रकार आहे!

संगीतातली लय आपण नंतर पाहू. पण मुळात लय म्हणजे काय हो?

बरं आधी मला एक सांगा, की हे कुठलं चित्र आहे? 🙂




हे ईसिजीचं चित्र आहे हे आपण ओळखलं असेलच! डॉक्टर कशाला काढतात हो एखाद्याचा ईसीजी? तर त्याच्या हृदयाच्या ठोक्यांची क्रिया नियमीत आहे किंवा नाही हे बघायला! म्हणजेच त्या माणसाची 'लय' कशी आहे, तो लयीत आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी! हृदयाची 'लय' बिघडली की जीवन बिघडलं आणि गाण्यातली लय बिघडली की गाणं बिघडलं असं समजावं! 🙂

प्रत्येक माणसाची अशी एक स्वतंत्र लय असते. हा लेख वाचताना एखाद्याच्या नाडीचे ठोके हे मिनिटाला ७५ असू शकतील, तर एखाद्याच्या ८० असू शकतील. परंतु प्रत्येकाचं हृदय एका लयीत सुरू असतं. सांगायचा मुद्दा हा की 'लय' हा जीवनाचा प्राण आहे. वास्तविक हा अगदी छोटा शब्द! दोनच अक्षरी - लय! परंतु त्याची व्याप्ती अफाट आहे. डॉक्टर मंडळी हृदयाला स्टेथोस्कोप लावून हे हृदयाचं संगीत ऐकतात. 'लब-ढब', 'लब-ढब', 'लब-ढब'! आहाहा, काय सुंदर नाद असतो हा? आपण ऐकला आहे का कधी? नसेल ऐकला तर केव्हातरी आपल्या फ्यॅमिली डॉक्टरांकडे त्यांचा जाऊन त्यांचा स्टेथो घेऊन अवश्य ऐका! 🙂

'लब-ढब', 'लब-ढब', 'लब-ढब'!

हृदयाचं काम एका छान नादमय लयीत सुरू असतं. जीवन सुरू असल्याची ती खूण आहे! हृदयाचे हे लयदार ठोके आईच्या पोटात असल्यापासून जे सुरू होतात ते अगदी शेवटचा श्वास सुरू असेपर्यंत! आमच्या गाण्याच्या भाषेत बोलायचं तर लयीची शेवटची तिहाई पडते आणि जीवनगाणं थांबतं! लय संपली, जीवन संपलं! बरं ही लय बिघडूनही चालत नाही. वर इसिजीचं जे चित्र लावलेलं आहे तो ईसीजी तेच तपसण्याकरता काढतात! पाहा मंडळी, आयुष्याचा आणि गाण्याचा किती जवळचा

संबंध आहे तो. हृदयाची लय बिघडली की जगणं मुश्किल होतं आणि गाण्याची लय बिघडली की गाणं बिघडतं!

किती महत्व सांगावं हो लयीच? मला सांगा लय कशात नसते? इथे आपल्या मिपावर अनेक चित्रकार मंडळी आहेत. त्यांना विचारा की एखादं चित्र काढताना त्या चित्रातली लय किती सांभाळावी लागते ते! चित्रातही एक अदृष्य लय असते, अस्सल चित्रकार ती सांभाळूनच उत्तम चित्र साकार करत असतो. अर्थात, मी या विषयात काही जास्त बोलू शकत नाही कारण मला त्या कलेतलं काही कळत नाही, फक्त आस्वाद घेता येतो. परंतु इथे उत्तमोत्तम कवी आहेत, त्यांना विचारा की कवितेतली एखादी ओळ बांधताना लयीचं महत्व काय अन् ती किती सांभाळावी लागते! लय ही प्रत्येक कलेत असतेच, मी फक्त संगीतातल्या लयीविषयी थोडंफार बोलण्याचा प्रयत्न करणार आहे!

कुठलीही कला ही लयीशिवाय जन्मूच शकत नाही. लय ही स्वयंभू असते, कलेत अंतभूतच असते. कलेच्या अविष्कारात ती कलेपासून वेगळी काढताच येत नाही!

अहो, कलेचं एक वेळ राहू द्या, तुम्हीआम्ही तिची आपापल्या वकुबानुसार निर्मिती करतो, आस्वाद घेऊ शकतो. पण एखाद्या तान्ह्या बाळाचं काय? त्याला कळते का हो लय?

एखादं अगदी तान्हं मूल जेव्हा धाय मोकलून रडत असतं तेव्हा आसपासची बरीच मंडळी त्या मुलाला जवळ घेत असतात, त्याची समजूत घालत असतात, तरीही ते गप्प होत नाही. पण जेव्हा त्या तान्हुल्याची आई त्याला हृदयाशी धरते तेव्हा ते पटकन रडायचं थांबतं, खुदकन हसतं! सांगा पाहू का बरं असं? त्या तान्ह्याला हीच आपली आई आहे, हे कसं कळतं बरं?

९ महिन्यांपासून ते आईच्या पोटात असतं त्या कालावधीत ते अक्षरश: सतत म्हणजे सतत आईच्या हृदयाची ती 'लब-ढब', 'लब-ढब' ऐकत असतं! तेवढी एकच खूण असते त्याच्याजवळ. ना त्याला काही दिसत असतं, ना काही कळत असतं, ना कुणी समजून सांगायला असतं! त्याची साथ असते ती फक्त त्याच्या माउलीच्या हृदयाची एका ठराविक लयीतली नादमयता! पण तसं प्रत्येकच माणसाच्या हृदयाची धडधड सुरू असते मग ते मूल आपल्या आईच्याच हृदयाचा आवाज कसं ओळखतं? तर त्याला कारण हे की वर म्हटल्याप्रमाणे प्रत्येकाची लय वेगळी, प्रत्येकाच्या लयीत सूक्ष्म फरक असतो आणि मंडळी आपल्याला कदाचित अतिशोयोक्ति वाटेल, परंतु विश्वास ठेवा, ते मूल एका क्षणात लयीतला तो सूक्ष्म फरक ओळखून फक्त त्याच्या आईने जवळ घेतल्यावरच एका क्षणात रडायचं थांबतं. आईच्या हृदयाजवळची ती जागा त्याच्या ओळखीची असते आणि आपल्याकरता हीच जागा सर्वात सुरक्षित आहे हा विश्वास त्या लहानग्याकडे असतो! ती ओळख असते ती त्या ठराविक लयीची, त्या माउलीच्या हृदयाच्या 'लब-ढब', 'लब-ढब' या लयदार नादमयतेची!

एक तान्हं मूल आपल्या आईचं हृदयसंगीत ओळखू शकतं, त्यातली नादमयता ओळखू शकतं! अर्थात, हे माझे विचार नव्हेत. ते मी माझ्या गुरुजींकडून शिकलो आहे. बघा बुवा तुम्हाला पटताहेत का ते! आमचे बाबूजी नेहमी म्हणायचे की कवी हा कविता लिहितांनाच त्याची लय निश्चित करत असतो. आपण फक्त ती लय ओळखायची आणि आपल्या आवडीच्या सुरात, आवडीच्या रागात, आवडीच्या धुनेमध्ये, कवितेतल्या भावानुसार ते गाणं बांधायचं! मूळ कविताच जर लयीत नसेल तर गाणं जन्माला येणं मुश्किल आहे! असो..

खरंच मंडळी, लयीचा शोध हा अनंत आहे. आपण तिचा जितका अभ्यास करू तेवढी ती अधिक सूक्ष्म होत जाते आणि पुन्हा अभ्यास करण्याकरता मुश्किल होऊन बसते. परंतु तिचा अभ्यास, तिचा शोध कधीच संपत नाही!

असो, तर मंडळी वरील विवेचन म्हणजे लयीबद्दलचे ढोबळमानाने काही जनरल विचार आहेत. मग आता संगीतातली, गाण्यातली लय म्हणजे काय हो? तिचा अनुभव कसा घ्यायचा? तिचं सौदर्य कसं अनुभवायचं? हे आपण पुढल्या भागात पाहू!

आमचे पक्याराव, 'तात्या, लय म्हणजे काय हो?' हा प्रश्न किती सहज विचारून गेले! परंतु हा प्रश्न विचारून त्यांनी माझी किती पंचाईत करून ठेवली आहे, नक्की कुठल्या परिक्षेला मला बसवलं आहे याची त्यांना तरी कल्पना आहे की नाही, देवच जाणे! 🙂

-- तात्या अभ्यंकर.

http://www.misalpav.com/node/2639

मिसळ पाव : विसोबा खेचर. तात्या अभ्यंकर

# गृहपाठ

## ताल केरवा :

चलते चलते

http://www.youtube.com/watch?v=ubQ9hrKO6XI&feature=related

लागा चुनरीमें दाग

http://www.youtube.com/watch?v=Efh7sCK6njA&feature=related

अरे संसार संसार

http://www.youtube.com/watch?v=9Pr21rLr90o&feature=related

ये शाम की तनहाईयां

http://www.youtube.com/watch?v=9cftvA06W6M&feature=related

## ताल रूपक :

आपकी नजरोंने समझा

http://www.youtube.com/watch?v=yPhBr3U-7Qk

शुक्रतारा मंदवारा

http://www.youtube.com/watch?v=bu10VgPSK-w

सखी मंद झाल्या तारका

http://www.youtube.com/watch?v=Au5WKqeyW2o&feature=related

## ताल दादरा :

बगळ्यांची माळ फुले

http://www.youtube.com/watch?v=bWqEOGiOlO8&feature=related

ये जिंदगी उसीकी है

http://www.youtube.com/watch?v=1Yf8C7swHZ0&feature=related

ठाडे रहियो ओ बांके यार

http://www.youtube.com/watch?v=ubQ9hrKO6XI&feature=related

सुन्या सुन्या मैफ़लीत माझ्या

http://www.youtube.com/watch?v=Nev93XxsAcc&feature=related

बहारों फ़ूल बरसाओ

http://www.youtube.com/watch?v=McP9D114BfU

केव्हा तरी पहाटे

http://www.youtube.com/watch?v=BiQeazlyMNs

जीना यहां मरना यहां

http://www.youtube.com/watch?v=5XOi1GzOgfc&ob=av3e

## ताल त्रिताल :

झनक झनक तोरी बाजे पायलिया

http://www.youtube.com/watch?v=en52pVnYyPs

मनमोहन मनमें हो तुम्ही

http://www.youtube.com/watch?v=A9ignpH-K3k&feature=related

जिया ना बुझे रे आज हमारा

http://www.youtube.com/watch?v=WDtigW_9gS0&feature=related

झुलवु नको हिंदोळा

http://www.youtube.com/watch?v=LL1bZn7YOcw&feature=related

प्रीतम दरस दिखाओ

http://www.youtube.com/watch?v=sNNuvBgeIBg&feature=related

मधुबनमें राधिका नाचे रे

http://www.youtube.com/watch?v=Nv973KjZH20

## ताल दीपचंदी

हरिप्रसाद चौरसिया बांसरी

http://www.youtube.com/watch?v=VnlyNIvQOt4&feature=related

झाकिर हुसेन : चार ताल की सवारी

http://www.youtube.com/watch?v=thk-DW499vg

झाकिर हुसेन, हरिप्रसाद चौरसिया,

http://www.youtube.com/watch?v=ilhdtkNLe_8

झाकिर हुसेन आणि अल्लरखां : एकताल

http://www.youtube.com/watch?v=qPozn49MciA

आधीच्या ३ भागांत दिलेल्या गाण्यांचे ताल ओळखण्याचा प्रयत्न करा

तालांसाठी एक साईट

http://www.school4all.org/index.php?option=com_content&view=article&id=193:2009-03-06-09-27-41&catid=129:2009-03-06-09-29-56&Itemid=68

संगीत कानसेनच्या सहापैकी  चौथा भाग इथेच संपतो

पहिल्या भागात आपण ध्वनी, स्वर आणि श्रुती पाहिल्या. त्यातल्या निवडक श्रुतींना सूराचा दर्जा मिळालेलं पाहिलं.

दुसऱ्या भागात आपण अलंकार, ताना, आलाप, पलटे, गमक पाहिले. भारतीय शास्त्रीय संगीताचं इतरांपासून वेगळेपण दाखवणारा हा भाग होता.

तिसरा भागात राग, थाट रागांगपद्धती यांवर आपण चर्चा केली. यात आपण राग म्हणजे काय आणि रागांची ओळख कशी वाढवावी ते पाहिलं.


चौथ्या भागात आपण ताल, लय, ठेका आणि संगीताचं नातं पाहिलं. संगीतकला ही कालबद्ध कला आहे. चित्रकलेला space लागते तर संगीताला time. त्यामुळे कोणतंही संगीत हे ताल आणि लयीच्या आधाराशिवाय अपूर्णच रहातं.

पाचव्या भागात पाहू
ख्याल, ठुमरी, ध्रुपद,  जाती, प्रबंध, होरी, चैती, कजरी, लोकसंगीत

सहाव्या भागात
घराणी, संगीतकार, तानसेन ते भीमसेन.

साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांना इंटरनेटवर मानाचे स्थान असावे या उद्देशाने अनेक संस्था आणि व्यक्ती आज काम करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातलीच एक. नेटाक्षरी हे कवितांचे ई साप्ताहिक, ई स्टाप हे विनोदाला वाहिलेले ई नियतकालिक, दुर्ग दुर्गट भारी ही महाराष्ट्रातील दुर्ग किल्ल्यांची माहिती देणाऱ्या ई पुस्तिकांची मालिका, स्वरनेटाक्षरी हे मराठीतले पहिले ऑडिओ ई नियतकालिक, मराठी कसे लिहावे, ई पुस्तक कसे बनवावे आदी ई लर्निंगची साधने, बालनेटाक्षरी हे मुलांसाठी नियतकालिक आणि आजवर प्रसिद्ध झालेली अनेक ई पुस्तके अशा आजवरच्या सुमारे दिडशे प्रकाशनांचा पल्ला ई साहित्य प्रतिष्ठानने गाठला आहे. लाखभर वाचकांपर्यंत ही प्रकाशने पोहचतात.



संगीत कानसेन हा सहा भागांच्या ई लर्निंगचा प्रवास खास भारतीय शास्त्रीय संगीताची ओळख मराठीतून करून देण्याचा प्रयत्न आपल्याला कसा वाटला ते कळवा. तसेच ई साहित्य प्रतिष्ठान ची इतर प्रकाशने विनामूल्य मिळण्यासाठी लिहा व भेट द्या.

नवीन प्रकाशने नियमित मिळण्यासाठी

esahity@gmail.com

आजवरची प्रकाशने वाचण्यासाठी

www.esahity.com